सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग,

वित्त विभाग(खुद्द)

मंत्रालय,

महाराष्ट्र शासन

# मा. मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत मुद्यांची तपशीलवार माहिती

# संकेतस्थळ

- **वापरण्यातील सुलभता-** www.finance.maharashtra.gov.in संकेतस्थळ वित्त विभागाने विकसित केले आहे. संकेतस्थळावर राज्याचा अर्थसंकल्प, कार्यक्रम अंदाजपत्रक, नागरीकांची सनद, वित्त विभाग (खुद्द) ची विषयसुची, म.ना. सेवा नियम, तसेच कार्यालयाकडून वेळोवेळी निर्गमित होणारे परिपत्रके, स्थायी आदेश, इत्यादी नियमितपणे प्रसिद्ध करण्यात येतात.
- **माहितीचे अद्ययावतीकरण** - प्रशासनात पारदर्शकता व जबाबदारीची जाणीव निर्माण होण्याच्या दृष्टीने नागरिकांची सनद प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच वित्त विभागाच्या संकेतस्थळाचे वेळोवेळी अद्यावतीकरण करण्यात येत आहे.

## माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण

- सदर अधिनियमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता अधिनियमांतर्गत वित्त विभागात जन माहिती अधिकारी (७३), प्रथम अपिलीय माहिती अधिकारी (१४) यांना पदनिर्देशित करण्यात आले आहे.

**विवरणपत्र क्रमांक २**

**जानेवारी २०२४ ते डिसेबर २०२४ या कालावधीत ( खुद्द ) मंत्रालयीन विभागात प्राप्त झालेल्या माहिती अर्जाचा तपशील दर्शविणारे विवरण पत्र**

| अ.क्र | विभागाचे नाव | डिसेंबर २०२३ अखेरीस प्रलंबित अर्जाची सुधारीत संख्या | २०२४ या वर्षी प्राप्त झालेल्या अर्जाची संख्या | एकुण माहिती अर्ज(रकाना क्र.३+४) | २०२४ या वर्षी निकाली काढलेल्या अर्जाची संख्या | निकाली काढलेल्या अर्जांपैकी | | २०२४ या वर्षी अखेरीस प्रलंबित अर्जाची संख्या (र.क्र.५-६) | अहवालाच्या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीपोटी जमा झालेली रक्कम(रुपये) | दारिद्र्य रेषेखाली ल लाभ घेतलेला लोकांची संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या अर्जाची संख्या | माहिती नाकारण्यात आलेल्या अर्जाची संख्या(र.क्र.६-७) | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| २ | वित्त विभाग(खुद्द) मंत्रालय,मुंबई | २ | १३२९ | १३३१ | १३३१ | १२३७ | ९४ | ० | १०४२१ | ० | -- |

- **लोकसेवा हक्क अधिनियतमांतर्गत सेवा अधिसूचित करुन ऑनलाईन प्रसिद्ध करणे-**
- वित्त विभागामार्फत (खुद्द) कोणत्याही प्रकारची सेवा ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात येत नसल्याने ही बाब वित्त विभागास लागू नाही.

- **केंद्र शासनाशी सुसंवाद:-**
- वित्त विभागाचे कराधान शाखेचे चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा ) अधिनियम २०२३ अतंर्गत सुधारणेचे प्रकरण केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे व त्याबाबत वित्त विभागामार्फत सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

# सुकर जीवनमान

- **नागरी सेवांचे सुलभीकरण**

वित्त विभाग (खुद्द) मंत्रालय यांचा थेटपणे जनतेशी संबंध येत नाही. तथापि, जनतेकडून तसेच वरिष्ठ स्तरावरुन प्राप्त झालेल्या तक्रारी/सूचना नुसार वित्त विभागाच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांना सेवांचे सुलभीकरणे करण्याकरिता वेळोवेळी सूचना देण्यात येत असतात.

- **वित्त विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या नियुक्त्या/बदली/पदोन्नती /सेवाजेष्ठता याबाबतची माहिती**
- वित्त विभाग (खुद्द) मधील गट-अ ते गट-क या संवर्गातील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची बदली/पदोन्नती/ सेवाज्येष्ठता याबाबतची कार्यवाही प्रशासकीय विभाग म्हणून सामान्य प्रशासन विभागाकडून केली जाते.
- वित्त विभागाच्या दिनांक २९.१२.२०२२ च्या शासन निर्णयानुसार वित्त विभाग (खुद्द) साठी निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार गट-क मधील वाहनचालक व शिपाई संवर्ग मृत संवर्गात जितके कर्मचारी कार्यरत असतील तितकी पदे अधिसंख्य सेवानिवृत्ती/राजीनामा/मृत्यू इ. कारणांमुळे रिक्त झाल्यानंतर ते पद आपोआप रद्द होईल. मृत संवर्गात सध्या अधिसंख्य म्हणून कार्यरत बाह्ययंत्रणेकडून घेण्यास मंजूरी देण्यात आली आहे. सद्यस्थितीत वाहनचालक संवर्गात मंजूर ७ पदांपैकी २ वाहनचालक व शिपाई संवर्गात ५२ मंजूर पदांपैकी  कर्मचारी कार्यरत आहेत.

- **सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे-**

- दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत महापार प्रणालीवर नोंदणी असलेल्या वित्त विभागातील १५५ अधिकाऱ्यांपैकी १५३ अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल पूर्ण झालेले असून उर्वरित भरुन घेण्याचे काम सुरू आहे.

# स्वच्छता

- **अभिलेख निंदणीकरण,वर्गीकरण व मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करणे.**
- वित्त विभागातील सर्व कार्यासनांमधील अधिकारी /कर्मचारी यांच्या बैठक व्यवस्थेत स्वच्छता व नीटनेटकेपणा आणण्याकरिता तसेच वित्त विभागातील जुन्या नस्त्यांचे निंदणीकरण ,नष्टीकरण व निर्लेखनाची प्रक्रिया प्राधान्याने करण्याकरिता वित्त विभाग शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.२५/समन्वय दिनांक ६ मार्च, २०२५ अन्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.
- त्यास अनुसरून वित्त विभागातील सर्व कार्यासनांनी अभिलेखांचे सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ फेब्रुवारी २०१८ च्या शासन निर्णयाप्रमाणे अभिलेखे निंदणीकरण,वर्गीकरण व मुदतबाह्य अभिलेखे नष्ट करण्याची प्रक्रिया पार पाडली आहे.
- **जुन्या वाहनांचे निर्लेखन.**
- जुन्या निर्लेखित केलेल्या शासकीय वाहनांची लिलावाद्वारे विक्री करण्यात आली आहे तसेच शा.नि.दि. ०५ जुलै,२०२३ अन्वये वित्त विभाग ( खुद्द) करिता राज्यस्तरीय वाहन आढावा समितीने मान्यता दिल्यानुसार १२ वाहने मंजूर करण्यात आली आहेत.

# कार्यालयीन स्वच्छता मोहिम

**BEFORE**





**AFTER**



BEFORE


# कार्यालयीन स्वच्छता मोहिम

AFTER










# तक्रार निवारण

- **आपले सरकार २.०** - आपले सरकार २.० पोर्टल वर वित्त विभागास दि.१५.०४.२०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या व निराकरण करण्यात आलेल्या तक्रारीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.


| विभाग | एकूण प्राप्त तक्रारी | निराकरण केलेल्या तक्रारी | प्रलंबित तक्रारी | प्रलंबित ची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| वित्त विभाग ( खुद्द) | ९७९ | ९६३ | १६ | २% |
| वस्तू व सेवा कर कार्यालय | १७७ | १६३ | १४ | ८% |
| लेखा व कोषागार संचालनालय | १२६ | १२४ | २ | २% |
| स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय | २२ | १९ | ३ | १४% |
| आभासी कोषागार कार्यालय | १७ | १५ | २ | १२% |
| एकूण | १३२१ | १२८४ | ३७ | ३% |



## पी.जी.पोर्टल वरील तक्रारींचे निराकरण

- पी.जी. पोर्टल वर वित्त विभागास दि.१५.०४.२०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या व निराकरण करण्यात आलेल्या तक्रारीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| विभाग | एकूण प्राप्त तक्रारी | निराकरण केलेल्या तक्रारी | प्रलंबित तक्रारी | प्रलंबितची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| वित्त विभाग ( खुद्द) | ४४८ | ४४० | ८ | २% |
| वस्तू व सेवा कर कार्यालय | ३८९ | ३८२ | ७ | २% |
| लेखा व कोषागार संचालनालय | १३ | १३ | ० | ०% |
| स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय | ० | ० | ० | ०% |
| आभासी कोषागार कार्यालय | १ | १ | ० | ०% |
| एकूण | ८५१ | ८३६ | १५ | २% |



# न्यायालयीन प्रकरणे

## वित्त विभागांतर्गत न्यायालयीन प्रकरणांची सद्यस्थिती खालीलप्रमाणे:-

| Total Number of Contempt Cases | | | Total Number of Cases pending before Supreme Court | Total Number of Cases pending before High Court | Total Number of Cases pending before MAT |
|---|---|---|---|---|---|
| Complied | Appeal Filed | No action | | | |
| 0 | 1 | 0 | 8 | 69 | 347 |

- वित्त विभागाकडे प्रलंबित असलेल्या न्यायालयीन प्रकरणांची यादी विधि व न्याय विभागामार्फत सरकारी वकीलांकडे पाठवून सदरची प्रकरणे प्राथम्याने सुनावणीस घेऊन निकाली काढण्याबाबत कळविण्यात येते.
- ज्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये वित्त विभागाचा थेट संबंध येत नाही अश्या न्यायालयीन प्रकरणांमधून वित्त विभागाचे नाव वगळण्याबाबत विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.
- प्रलंबित जुनी न्यायालयीन प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने विभागांतर्गत तिमाही आढावा घेण्यात येतो.

# कार्यालयीन सोई सुविधा

- **कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था:-** वित्त विभाग (खुद्द) कार्यालयामध्ये पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच शुद्ध पाण्यासाठी RO system देखील बसविण्यात आलेली आहे.
- **कर्मचारी व अभ्यागंत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था:-** कर्मचारी व अभ्यागंत यांचेसाठी महिला व पुरूष असे स्वतंत्र व स्वच्छ प्रसाधन गृहांची सुविधा उपलब्ध केलेली आहे.
- **कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे:-** सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक लावण्यात आलेले आहेत.
- **कार्यालयाचे सौंदर्यीकरण:-** सर्व कार्यालयांमधील वातावरण प्रसन्न व आल्हाददायक राहील या करिता दररोज साफसफाई करण्यात येते.

# कामाकाजातील सुधारणा

- **कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी  यांचे ई-ऑफिस प्रणाली वापरण्याचे प्रमाण-**

- वित्त विभागास मोठ्या प्रमाणात इतर मंत्रालयीन विभागांकडून ई-ऑफिसद्वारे नस्त्या प्राप्त होत असतात. त्यावर वित्त विभागामार्फत तात्काळ कार्यवाही करुन नस्ती ई-ऑफिसद्वारेच संबंधित विभागांना परत करण्यात येते . तसेच वित्त विभागांतर्गत तयार होणाऱ्या नस्त्या ई-ऑफिसच्या माध्यमातूनच सादर करण्यात येतात.
- वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक-संकीर्ण २०२५/प्र.क्र.१४४/प्रशासन-१दि. ०८ एप्रिल २०२५ नुसार कार्यालयीन कामाकाजात ई-ऑफिस चा वापर १०० टक्के करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

- **वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांबाबत स्पष्टीकरण/खुलासा वेळीच प्रसिद्ध करणे-**

- माहिती व जनसंपर्क विभागाकडून प्राप्त होणाऱ्या वित्त विभागाशी संबंधित वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांबाबत विभागामार्फत वेळोवेळी खुलासा करण्यात येत असतो.

# क्षेत्रिय कार्यालयांना भेटी

- दि.१३ मार्च,२०२५ रोजीच्या प्रधान सचिव ( लेखा व कोषागारे ) यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. त्यातील निर्देशानूसार क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देण्यासाठी उपसचिव श्री.वि.नि.ढमाळ यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यानूसार त्यांनी वस्तू व सेवाकर तसेच लॉटरी संचालनालय या कार्यालयास भेट दिली असून त्याचा अहवाल सादर केला आहे. तसेच भेटी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबीचा अनुषंगाने संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत.
- वित्त विभागातील कार्यासनांनी केलेल्या कामाची पाहणी प्रधान सचिव ( लेखा व कोषागारे ) यांच्यामार्फत करण्यात आली आहे.

# आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

- लागू नाही.

धन्यवाद!